## मुस्लिम अनुनय कुठे नेणार?

धर्माधिष्ठित राखीव जागा काय म्हणून? घटनेमध्ये दोन कलम आहेत, ३४१ आणि ३४२. ३४१ हे अनुसूचित जातीकरिता आहे. ३४२ हे अनुसूचित जमातीकरिता आहे. त्याचप्रमाणे घटनेच्या १५(४) आणि १६(४) यामध्ये राज्य सरकारला अशी शक्ती प्रदान केली आहे की, त्यांनी हे दोन वर्ग वगळून ज्या वर्गामध्ये शिक्षणाचा प्रसार पुरेसा नाही किंवा जे वर्ग सरकारी नोकऱ्यात पुरेशा प्रमाणात नाहीत त्यांच्याकरिता इतर मागासलेले वर्ग म्हणून राखीव जागा ठेवण्याची सोय आहे. अर्थात या कलमाखाली मुसलमानांना सुद्धा, जर ते आर्थिकदृष्ट्या मागासलेले असतील व त्याचप्रमाणे सरकारी नोकऱ्या कमी असतील तर याचा लाभ त्यांना मिळू शकतो. पण असे असूनही सध्या या सरकारने केवळ मुसलमानांकरिताच राखीव जागा ठेवण्याची तरतूद केली आहे. त्यांनाच मी धर्माधिष्ठित राखीव जागा म्हणतो. हे पूर्णपणे घटनेशी विसंगत असून, अशाप्रकारची सोय करणे योग्य नाही, पण मुसलमानांच्या व्होट बँकेवर नजर ठेवून ही सोय केलेली आहे. हे सर्वस्वी घटनेच्या विरुद्ध आहे, यासाठी म्हणूनच सरकारने सच्चर समितीचा अहवाल मागितला. तो अहवाल प्राप्त झाला आहे आणि तो संपूर्ण अहवाल वाचल्यानंतर असे लक्षात येते की, सच्चर कमिटीने फार मोठ्या चुका त्यात करून ठेवल्या आहेत.

त्याची काही निवडक उदाहरणे अशी आहेत- उदाहरणार्थ आंध्रप्रदेश येथे हिंदूंपेक्षा मुसलमानांजवळ जमीन जास्त आहे. त्यांच्यात पुरुषाचे साक्षरतेचे प्रमाण ७१ टक्के असून, हिंदूंचे फक्त ५९ टक्के आहे. स्त्रियांचीसुद्धा ही स्थिती आहे. त्यांचे साक्षरतेचे प्रमाण ६० टक्के असून, हिंदू ५८ टक्के आहे. राजस्थान राज्यामध्ये मुसलमानांजवळ हिंदूंपेक्षा जास्त जमीन आहे. त्यात पुरुषांचे शिक्षणाचे प्रमाण ५९ टक्के आहे. स्त्रियांचे शिक्षणाचे प्रमाण ५७ टक्के आहे. याच्याच तुलनेत हिंदूंमध्ये हेच प्रमाण अनुक्रमे ५७ टक्के आणि ५२ टक्के आहे. तिसरे राज्य केरळ इथे मुसलमानांजवळ ५९ टक्के जमीन असून, उरलेली जमीन हिंदूंजवळ आहे. शिक्षणाचे प्रमाण पुरुषांत ९८ टक्के आणि स्त्रियांत ९५ टक्के आहे. याउलट हिंदूंमध्ये हेच प्रमाण अनुक्रमे ९६.२ टक्के असून, ५७ टक्के स्त्रियांत आहे. नंतरचे राज्य पश्चिम बंगाल- मुसलमानांजवळ १.५१ टक्के जमीन आहे. हिंदूंतही तेच प्रमाण १.४१ टक्के आहे. या राज्यात मुस्लिम पुरुषांत ६२ टक्के साक्षरता असून, हिंदूंमध्ये ती ६० टक्के आहे. ती स्त्रियांत ५९ टक्के आणि ५७ टक्के आहे. नंतरचे राज्य गुजरात- यामध्ये मुसलमानांजवळ हिंदूंपेक्षा जास्त जमीन आहे. तसेच गुजरातमध्ये मुसलमानांमध्ये साक्षरतेचे प्रमाण ५९ टक्के असून, स्त्रियांत ५७ टक्के आहे. स्त्रियांच्या तुलनेत हिंदू पुरुष ५७ टक्के, तर स्त्रियांमध्ये ५६ टक्के लोक साक्षर आहेत. हे काही राज्यांचे आकडे उपलब्ध आहेत. बाकीचे आकडे एकतर सच्चर कमिटीने दाबून टाकले किंवा ते उघडकीला आले नाही. यापैकी दोन राज्यांत- गुजरात आणि राजस्थानमध्ये भारतीय जनता पार्टीचे राज्य आहे. पश्चिम बंगालमध्ये मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे राज्य आहे, ज्यांचा राखीव जागांना पाठिंबा आहे. केरळमध्येसुद्धा आलटून पालटून ख्रिश्चन-मुसलमान आणि हिंदूंची सरकारे अस्तित्वात येतात. उत्तरप्रदेशमध्ये याचा पत्ताच नाही. हीच स्थिती बिहारची आहे. आश्चर्याची गोष्ट म्हणजे अशी की, महाराष्ट्रातसुद्धा हे आकडे उपलब्ध नाही. याचे कारण गेली दहा वर्षे महाराष्ट्रात काँग्रेसचे सरकार आहे.

सच्चर कमिटीचा अहवाल सरकारला सादर होण्याअगोदर वर्तमानपत्रातून फुटला आणि त्यामुळे विद्यार्थ्यांनी फार मोठ्या चळवळी उभारल्या. याचे कारण असे आहे की, राखीव जागा इंजिनीयरिंगपासून शिक्षणापर्यंत सर्व जागी लागू होणार आहे. स्वाभाविकच विद्यार्थ्यांमध्ये इतर चळवळ सुरू झाली की, लोकांना राखीव जागा दिली तर आमच्याकडे काय राहणार, हा प्रश्न सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित आहे.

वेळी व अवेळी केंद्रीय मंत्री अर्जुनसिंग यांचा मध्यप्रदेशमध्ये पूर्ण बोजवारा उडाला आहे. ते जाहीर करीत असतात की, सरकारचे धोरण असे आहे की, मुसलमानांसाठी २० टक्के राखीव जागा ठेवावयाच्या असाही प्रयत्न झाला. सैन्यात मुसलमानांची आकडेवारी काय? पण त्याला सर्व सेनाप्रमुखांनी इतका विरोध केला की, त्यामुळे सध्याच्या सरकारची अशी हिम्मत झाली नाही की, प्रश्न पुढे रेटावा. म्हणजेच केंद्र सरकारचे हे धोरण आहे की, केवळ तो मुसलमान आहे, म्हणून त्याच्यासाठी एक विशिष्ट टक्केवारीत राखीव जागा ठेवाव्यात. यावेळी हा विचार नाही की खरोखरीच ते आर्थिकदृष्ट्या मागासलेले आहेत का किंवा त्यांच्यामध्ये शिक्षणाचा प्रसार आहे किंवा नाही. अर्जुनसिंगसारख्या पडेल उमेदवाराची सोय लावण्यासाठी हा सर्व तमाशा सुरू आहे. अर्जुनसिंग हा एकटाच पडेल उमेदवार काढा म्हणजे त्याचीही सोय होईल.

हे आता लपून राहिलेली नाही की, दहशतवादी कार्यामध्ये बाहेरून जे मुसलमान येतात त्यांना स्थानिक मुसलमान आश्रय देतात. तसेच नशेचा जो व्यापार आहे त्यात प्रामुख्याने मुसलमानच आहेत. असे असूनही हा सगळा उपद्रव करायचा विचार आहे. देशाच्या सुदैवाने हे सैन्य घरापर्यंत पोहोचले नाही. पण कधीना कधी अशा राखीव जागा झाल्या त्यातून प्राप्त झालेल्या अर्हतेच्या जोरावर मुसलमान हेही पुढे-पुढे होतील हे अशक्य नाही.

लोकसंख्येची वाढ होऊ नये म्हणून कुटुंब नियोजनाची फार मोठी चळवळ सगळीच राज्य सरकारे चाल वितात. पण ही चळवळ फक्त हिंदूंपुरती मर्यादित आहे आणि मुसलमानांत अगदी अल्प प्रतिक्रिया आहे. तीन मुलांच्या वर मुले असली तर त्याला उमेदवार म्हणून कुठल्याही निवडणुकीत उभे राहता येत नाही. पण यावेळी हा विचार होत नाही की, हिंदू एकच बायको करू शकतो, पण मुसलमान चार बायका करू शकतात. त्याला प्रतिबंध नाही. त्या प्रत्येक बाईची तीन मुलं धरली तर १२ मुले होतात आणि याचे उत्तर अजून सरकारने दिले नाही की, असा उमेदवार निवडणुकीला उभा राहू शकतो का? कारण त्या माणसाला हे खुले आहे की मला प्रत्येक बायकोपासून तीनच मुले आहेत. (पान १ वरून)

चौथ्याचाही याचा विचार कधीतरी सरकारने केला आहे का?

दुर्दैवाची गोष्ट अशी, हा विचार सरकार करायला तयार नाही. कारण मतपेटीवर बंधन येते. पाकिस्तान ज्यावेळेला निर्माण झाले त्यावेळला त्याचे मुख्य प्रणेते बॅ. मोहम्मद अली जीना याने पूर्व बंगाल आणि पा किस्तान यांना जोडणारी एक कॉरिडॉर असावी अशी मागणी केली. ती मागणी त्यावेळेला तर मंजूर झाली नाही, पण आज अशी परिस्थिती आहे की, कॉरिडॉर आपोआप तयार होईल. ही कॉरिडॉर ज्या राज्यातून जाणार होती ती राज्य- आसाम, बिहार आणि उत्तर प्रदेशचा काही भाग. त्यापैकी आसाममध्ये हिंदू अत्यंत अल्प आहेत, मुसलमान बहुसंख्य आहेत. बिहारच्या काही जिल्ह्यात हीच स्थिती आहे. हेच उत्तर प्रदेशला लागू होते.

बिहारमध्ये यादव आणि मुसलमान यांची युती होऊन लालूप्रसाद यादवने जवळपास वीस वर्षे यथेच्छ धुमाकूळ घातला. मुलायमसिंगसुद्धा यात मागे नाही, त्यानेही मुसलमान आणि यादव यांची युती करून आपले राज्य स्थापन केले. आता ते डळमळायला लागले, हा भाग वेगळा. आसाममध्ये काँग्रेसच्या नावाखाली मुसलमानांचे राज्य आहे म्हणजे आता आपल्या हाती एवढेच आहे की, देशाचे आणखी एक विभाजन करून एक नवीन  पाकिस्तान निर्माण करायचे.

तामिळनाडूनंतर पुन्हा भाषावार प्रांत रचनेसाठी कमिशन नेमण्यात यावे, अशी मागणीच केली आहे. तीच स्थिती कर्नाटकाची आहे. प्रश्न वेगवेगळे आहेत. पण त्यांचे स्वरूप वेगळे असले तरी परिणाम एकच आहे. कर्नाटकात तेलगू राज्य असावे, अशी मागणी आहे. तामिळनाडूत ब्राह्मणांना वेगळे राज्य पाहिजे.

वस्तुत: मी स्वत: भाषावार प्रांतरचनेच्या विरुद्ध आहे. कारण भाषावार प्रांतरचनेचा पुरस्कार करणारे स्वतंत्र विदर्भ राज्याची मागणी करतात. ही मागणी मंजूर झाली तर स्वतंत्र कोकणाची मागणी होईल आणि महाराष्ट्रातून मुंबई वेगळी करावी, असे मत संसदेत व्यक्त झाले आहे. त्याला विरोध आहे, हा भाग वेगळा. पण एकदा भाषावार प्रांतरचनेसाठी आयोग नेमण्यात आले तर या सगळ्या मागण्या पुढे आल्याशिवाय राहणार नाही. आजही बेळगाववरून महाराष्ट्र आणि कर्नाटक राज्यामध्ये छुपे युद्ध सुरूच आहे.

भाषावार प्रांतरचनेमुळे भाषाभाषांत भांडणे निर्माण झाली. त्यातून स्वतंत्र विदर्भापासून स्वतंत्र तेलंगणापर्यंत मागण्या पुढे आल्या. मुसलमान उघड बोलत नसले, तरीही त्याला एक पाकिस्तान हवेच आहे. म्हणजे याचा अर्थ असा मुळीच नाही, त्या पाकिस्तानात सगळेच मुसलमान जातील, ते इथेच राहणार आहेत. फक्त जेवढा अधिक भूभाग हातात पडेल तेवढा त्यांना हवा आहे. आदिवासींनासुद्धा स्वतंत्र राज्य हवे आहे.  हिंदुस्थानचे जितके तुकडे पाडता येतील तितके तयार होईल. त्यात तामिळनाडूचे ब्राह्मण अग्रेसर आहेत. वस्तुत: असे मानण्यात येते व ते बहुतांशी खरे आहे की, ब्राह्मणांचा पुढे शिक्षणाचा प्रश्न नाही. पण कोणीही भाषेचा मनुष्य मला एक हिंदुस्थान पाहिजे, असे म्हणत नाही, ही दुर्दैवाची गोष्ट आहे. मग याचा फायदा जर इतर ध र्मियांनी घेतला तर त्यात त्यांचा काय दोष? मी स्वत: नांदणार नाही आणि तुला नांदू देणार नाही, अशी वृत्ती आहे. याचे जे परिणाम आजच दिसतात ते असे आहे, जबरदस्त भाववाढ आहे. विजेचा प्रचंड तुटवडा आहे आणि औद्योगिकदृष्ट्या सतत पीछेहाट सुरू आहे. नुकतेच पश्चिम बंगालमध्ये सिंगूर येथे घडले की, तेथे टाटा उद्योग काढू द्यायचा नाही. ते इतरत्रही घडायला हरकत नाही. रतन टाटा यांनी एकदा एका मुलाखतीत असे म्हटले होते की, माझ्या उद्योगात मराठी, गुजराती, मद्रासी अशी भरती व्हायला पाहिजे हे मला मान्य नाही. मला एकही मनुष्य असा मिळाला नाही की मी भारतीय आहे म्हणून मला नोकरी द्या. असा मनुष्य मला एकही भेटला नाही, हे टाटांचे अनुभवजन्य उद्‌गार आहेत. हे इतर उद्योगपती बोलत नाही, पण तिथेही वस्तुस्थिती तीच आहे.

ही सगळी एकूण परिस्थिती पाहता या देशाचे भवितव्य काय आहे, हे सांगता येत नाही. ब्रिटिशांच्या अगोदर सर्वात मोठे राज्यकर्ते हे मुसलमानच होते. जेमतेम दोन जिल्ह्यांएवढे शिवाजीचे राज्य, बाकी शाह किंवा मोगल इतर शाह्यांची राज्ये होती. हीच परिस्थिती पुन्हा निर्माण करावयाची आहे का, हा मोठा प्रश्न आहे. एकदा बाळासाहेब ठाकरेंसारखा मनुष्य तोंड फोडून बोलतो, पण त्याला जातीवादी ठरविण्यात येते. वस्तुत: सर्वात मोठा जातीयवादी पक्ष हा काँग्रेसच आहे, पण त्याला असे म्हणण्याची कोणाचीही हिंमत नाही. काँग्रेसमध्ये अगदी ग्रामपंचायतीपासून तर लोकसभेतील प्रत्येक जागा ही जातीय निकषावर देण्यात येते आ णि आपल्या देशात जो लोकशाहीचा तमाशा सुरू आहे, त्यात तिकिटेही अशीच वाटली जातात आणि

मतदार असंच मतदान करतात. असा मतदारच नाही की जो असा म्हणतो की, उमेदवारांच्या लायकीवर मी मतदान करील. तरी महात्मा गांधींनी जातिभेद नष्ट करावा असा आयुष्यभर आग्रह धरला, पण त्या आग्रहाचा काहीही परिणाम झाला नाही. उलट गांधीजींचा शेवट हा काँग्रेसनेच केला. फक्त गोडसे निमित्त मात्र झाला. त्याचा फायदा घेऊन महाराष्ट्रातसुद्धा गांधीवादी पुढल्या काळात राजकारणातून हद्दपार करण्यात आले. याचे फार सुरेख वर्णन, मुंबई उच्च न्यायालयाचे हंगामी मुख्य न्यायमूर्ती यांनी आपल्या 'काळाची पाऊले' या पुस्तकात केले आहे. शिवाजीला या देशात देवाचे राज्य उभे करायचे होते. प्रत्यक्षात दानवाचे राज्य उभे झाले, ही या देशाची सगळ्यात मोठी शोकांतिका आहे.

चंद्रशेखर माडखोलकर
अधिवक्ता